# पोलिसांनी नोकरीवर लक्ष देत स्वत:चे आरोग्य संभाळणे गरजेचे

## १२ वर्षांत ५ अधिकारी अन् ११४ कर्मचाऱ्यांचा गेला जीव : ताणतणाव, धावपळ, विश्रांतीचा अभाव आदी कारणांमुळे पोलिसांचे आरोग्य बिघडले

बीड । दिव्य न्युज

ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता आणि दिवाळी, दसरा, रमजान ईद अशा विविध सणोत्सव काळात २४ तास कर्तव्यावर राहून जनतेची सेवा करणाऱ्या पोलिस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे आरोग्य बिघडत चालले आहे. अपुरे मनुष्यबळ आणि त्यातच बिघडलेली कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवताना कामाचा ताण येत आहे. त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांचा हृदयविकारासह इतर आजारांनी मृत्यू होत आहे. त्यामुळे सामान्यांच्या सेवेसाठी कायम रस्त्यावर राहून सुरक्षा करणाऱ्या पोलिस दादा, ताईनी आरोग्याची काळजी घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. २०१३ ते २०२५ या काळात पाच अधिकारी आणि ११४ कर्मचाऱ्यांचा वेगवेगळ्या कारणांनी जीव गेला आहे. ही आकडेवारी डोळ्यात पाणी आणणारी आहे. दरम्यान, प्रत्येक वर्षी पोलिस दलाकडून अधिकारी व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. परंतु काही जण याकडे दुर्लक्ष करतात. असे न करता प्रत्येकाने आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ३ महिलांचाही गेला जीव

जिल्हा पोलिस दलातील तीन महिलांचाही मृत्यू झाला आहे. यात २०१६, २०२१ आणि २०२३ सालातील प्रत्येकी एकीचा समावेश आहे.

### ४५ जणांना अनुकंपावर मिळाली नोकरी

२०२१ ते आजपर्यंत जिल्ह्यातील ४५ जणांना अनुकंपावर नोकरी मिळाली आहे. यात नऊ महिला आणि ३६ पुरुषांचा समावेश आहे. आणखी काही प्रस्तावांवर कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात आले.

### अनुकंपा भरती आकडेवारी







### कोरोना काळात २५ मृत्यू

२०२० ते २०२३ या तीन वर्षांत कोरोना महामारी होती. या काळात रक्ताचे नातेवाईकही जवळ येत नव्हते.

**दुसरीकडे पोलिस विभागाचे अधिकारी, कर्मचारी हे २४ तास रस्त्यावर होते.**

कुटुंबापासून दूर राहून त्यांनी आपले कर्तव्य बजावले. यात काही जणांना कोरोनाची बाधा झाली.

**२०२० व २०२१ या दोनच वर्षांत २५ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद पोलिस विभागात आहे.**

### बीड पोलिस दलातील मनुष्यबळ

| | |
|---|---|
| १ | पोलिस अधीक्षक |
| २ | अपर पोलिस अधीक्षक |
| ८ | उपअधीक्षक |
| २५ | पोलिस निरीक्षक |
| ६१ | सहायक पोलिस निरीक्षक |
| ९४ | पोलिस उपनिरीक्षक |
| २३१० | पोलिस कर्मचारी |

### मृत्यूची ठळक आकडेवारी






### पोलिसांच्या मृत्यूची कारणे:

कामाचा ताण : अपुरे मनुष्यबळ असल्याने पोलिसांवर कामाचा अधिक बोजा येतो.
हृदयविकार : कामाच्या तणावामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो.
इतर आजार: कामाच्या अनियमिततेमुळे आणि तणावामुळे इतर आजार होतात.
अनियमित जीवनशैली : अनियमित कामाचे तास, जेवणाच्या वेळेतील अनियमितता आरोग्यावर परिणाम करते.
वातावरणाचा परिणाम : ऊन, वारा, पाऊस यासारख्या वातावरणात सतत काम केल्याने शारीरिक थकवा येतो.
अपघात : कर्तव्यावर जाताना किंवा येताना अपघात होऊन मृत्यू होणे.

आरोग्याची काळजी कशी घ्यावी?
नियमित व्यायाम : शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी नियमित व्यायाम आवश्यक आहे.
संतुलित आहार : शरीराला आवश्यक पोषक तत्त्वे मिळण्यासाठी संतुलित आहार घ्यावा.
तणावमुक्त जीवन : कुटुंबासोबत वेळ घालवून किंवा छंद जोपासून तणाव कमी करावा.
पुरेशी झोपः शरीर आणि मनाला आराम देण्यासाठी पुरेशी झोप गरजेची आहे.
वेळेचे नियोजन : काम आणि वैयक्तिक आयुष्याचे योग्य नियोजन करावे.
नियमित आरोग्य तपासणी : आरोग्य समस्या टाळण्यासाठी नियमितपणे डॉक्टरांकडून तपासणी करावी.
तत्काळ उपचार : काही आरोग्यविषयक लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा.

कर्तव्यासोबतच आरोग्याकडे लक्ष देणेही आवश्यक आहे. नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि तणावमुक्त जीवन जगणे आवश्यक आहे. एक तास स्वत:साठी दिलाच पाहिजे. कुटुंबात वेळ घालवावा. आराम, झोप, आहारही महत्त्वाचा आहे. प्रत्येकाने काळजी घ्यायलाच हवी. वेळेचे नियोजन करावे. **–नवनीत काँवत, पोलिस अधीक्षक, बीड**

........................

पोलिसांचे काम आव्हानात्मक असून आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. अनियमित वेळा, तणाव आणि कामाचा ताण यामुळे हृदयविकार व इतर आजारांचा धोका वाढतो. नियमित तपासण्या, संतुलित आहार, व्यायाम आणि पुरेशी विश्रांती आवश्यक आहे. वेळेवर उपचार घेणे आणि मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. थोडीही लक्षणे जाणवल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
**डॉ. सचिन आंधळकर, वैद्यकीय अधिकारी, पोलिस रुग्णालय बीड**

# टाकळी भिमा येथे बिबट्याचा थेट वावर; उद्योजक राहुल करपे यांची वनविभागाकडे बंदोबस्ताची मागणी

शेतामध्ये आता विविध शेत मशागतीचे कामे सुरू आहे. अनेक ठिकाणी काही शेतकरी हे एकट्याने शेतात खुरपणीचे व इतर काम करतात. दुपारच्या वेळेला शेतात फार कोणी नसल्यामुळे बिबट्या हल्ला करू शकतो. त्यामुळे बिबट्याचा वावर असल्याने भितीचे वातावरण आहे. शेतकर्यांना आपला जीव मुठीत धरून जगावे लागत आहे. त्यामुळे वन विभागाने तात्कळ बिबट्धाचा बंदोबस्त करावा. – राहुल करपे, चेअरमन योगीराज उद्योग समुह.



पुणे । दिव्य न्युज

टाकळी भिमा गावात सध्या बिबट्याचा मुक्त संचार वाढत असून, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर योगीराज उद्योग समूहाचे चेअरमन राहुल करपे यांनी वनविभागाकडे बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

टाकळी भिमा पंचक्रोशीत वन्य प्राण्यांचा वावर सातत्याने वाढत असून, परिसरात बिबट्याचा थेट वावर दिसून आला आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण अधिक तीव्र झाले आहे. त्यामुळे नागरिकांना रात्री अपरात्री रस्त्यावर फिरणे टाळावे लागत आहे. टाकळी भिमा गावात बिबट्याचा वावर दिसून आल्याने भीतीचा कळस गाठला आहे. शेतकऱ्यांच्या जनावरांवर हल्ले होऊन मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्यास पुणे विभागाकडून तुटपुंजी नुकसान भरपाई देऊन प्रकरण मिटवले जाते,परंतु एखाद्या माणसाचा जीव गेला, तर वनविभाग भरपाई देणार का? असा सवाल राहुल करपे यांनी वनविभाग अधिकाऱ्यांना विचारला आहे.त्याचप्रमाणे वन विभागाच्या वतीने फॉरेस्ट परिसरामध्ये बिबट प्रवण क्षेत्र म्हणून बोर्ड लावण्यात यावेत अशी मागणी या वेळेस करण्यात आली. यावेळी वनविभागाच्या रेंजर गौरी हिंगणे मॅडम,पाटील साहेब, दत्तात्रय खेडे, शशिकांत आदक, बापू काळे,योगेश काळे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# कॅप्टन परशुराम शिंदे वेटरण अचिव्हर्स पुरस्काराने सन्मानित..!




पुणे । दिव्य न्युज

कॅप्टन परशुराम शिंदे, माजी सैनिक संस्थापक अध्यक्ष माजी सैनिक विकास संघटना खराडी वडगाव शेरी पुणे,यांना कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून 'वेटरण अचिव्हर्स' द्वारा नुकतेच सन्मानित करण्यात आले.

कॅप्टन परशुराम शिंदे यांनी भारतीय सेना दलातून ३२ वर्षे सेवा करून २८ फेब्रुवारी २००५ मध्ये निवृत्त झाले, त्यानंतर आपल्या दुसऱ्या इनिंग मध्ये त्यांनी समाजसेवेचा वसा हाती घेत माजी सैनिक विकास संघटनेच्या माध्यमातून गेल्या वीस वर्षाच्या कारकिर्दीमध्ये, महिला बचत गट,वीर नारी, वीर पत्नी, माजी सैनिक, तसेच त्यांचा सर्व परिवार या सर्वांच्या पेन्शन बद्दल, तसेच इतर काही अडचणी असतील,त्या सोडवण्याचं काम अहोरात्र करत आलेले आहेत, राष्ट्र सेवेमधील उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल, त्यांना २६ जुलै २०२५ रोजी सदन कमांडचे आर्मी कमांडर यांच्याकडून वेटरण अचिव्हर्स अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

# राजस्थानी प्राथमिक विद्यालयात नागपंचमी सण साजरा





बीड । दिव्य न्युज

आज विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच आपल्या संस्कृतीची ही माहिती व्हावी या उद्देशाने शाळेमध्ये आज नागपंचमी सणसाजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ जाजू मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ बियाळे मॅडम या होत्या तर प्रमुख वक्ते म्हणून श्री तोष्णीवाल सर व सौ चांडक मॅडम या होत्या. यावेळी प्रमुख वक्ते श्री तोष्णीवाल सर यांनी यादव काळा पासून आज पर्यंत कश्या पद्धतीने नागपंचमी सणं कसा साजरा करतात ते यावेळी सांगितले. तसेच श्रीकृष्ण व कालिया सापाची गोष्ट यावेळी विद्यार्थ्यांना सांगितली. सौ चांडक मॅडम यांनी यावेळी सुंदर असे गीत यावेळी सादर केले. प्रमुख पाहुणे सौ बियाळे मॅडम यांनी अक्कण माती चिकन माती हे सुंदर असे गीत सादर केले. यानंतर वारूळाचे पुजन करण्यात आले. अध्यक्षीय समारोप करताना सौ जाजू मॅडम यांनी महाभारत काळात, राजा परीक्षिताचा मुलगा, जन्मेजय याने आपल्या वडिलांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी सर्प यज्ञ केला, ज्यामुळे नागांचा नाश झाला. अस्तिक ऋषींनी सर्व नागाणा मुक्त केले असे मानले जाते की श्रावण शुक्ल पक्षाच्या पाचव्या दिवशी नाग लोकात एक विशेष उत्सव असतो. नाग लोकांनी अस्तिक ऋषींना गुरु मानले असे प्रतिपाद सौ. जाजू मॅडम यांनी केले. यावेळी मुलींसाठी झोका व झिम्मा फुगडी खेळण्याची सोय मुख्याध्यापक श्री. सोहनी सर सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री लड्डा सर, बोरा सर, बियाणी सर यांनी यावेळी शाळेत केली होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ सुराणा मॅडम यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्री. बोरा सर यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# क्रांतिकारी शिक्षक संघटनेचा उपक्रम 'महाराष्ट्र मॉडेल' होण्याच्या वाटेवर–शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांचा विश्वास





मालेगाव । दिव्य न्युज :

क्रांतिकारी शिक्षक संघटनेच्या पश्चिम विभागाचे अध्यक्ष प्राचार्य सतीश वाघमारे यांनी महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री मा. दादासाहेब भुसे यांची मालेगाव येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन संघटनेच्या विविध उपक्रमांबाबत सकारात्मक संवाद साधला. या भेटीत क्रांती दिन निमित्त राबविण्यात येणाऱ्या 'क्रांती सप्ताहा' संदर्भातील माहिती व उपक्रमाचा सादरीकरणात्मक व्हिडिओ त्यांनी भुसे साहेबांना सादर केला. व्हिडिओ बारकाईने पाहिल्यानंतर भुसे साहेबांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. हा उपक्रम पुणे मॉडेल ठरू शकतो – इतकंच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावीपणे राबवता येईल, असे उद्गार त्यांनी यावेळी काढले. त्यांच्या या प्रतिसादामुळे शिक्षक संघटनेच्या कार्याला नवे बळ मिळाले असून, राज्यभरात शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडविण्यासाठी हा उपक्रम प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी बाळासाहेब देशमुख यांची फेर निवड

जिंतूर । दिव्य न्युज : सालेह चाऊस



परभणी येथील काँग्रेस पक्षाचे सक्रीय कार्यकर्ते बाळासाहेब देशमुख यांची दिनांक २९ जुलै रोजी अखिलभारतीय काँग्रेस पक्षाचे जनरल सेक्रेटरी खासदार के सी वेनुगोपाल यांनी निवडझाल्याचे पत्र श्री बाळासाहेब देशमुख यांना दिले आहे या पूर्वी तेच उपअध्यक्ष म्हणून होते त्याची फेर निवड झाल्यामुळे परभणी जिल्ह्यातील कांग्रेस कार्यकत्यांनी त्याचे अभिंदन केले आहे

बाळासाहेब देशमुख यांच्या काँग्रेस पक्षामध्ये अनेक वर्षापासून संबंध आहे त्यांनी आजपावेतो कोण्या त्यातही इतर पक्षात प्रवेश केला नाही एकनिष्ठ राहिले आहेत त्याच्या निवडीबद्दल खुप खुप शुभेच्छा दिल्या आहेत

# 'अल्पसंख्याक' विद्यार्थ्यांसाठी परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृती येत्या १ ऑगस्ट पर्यंत ऑनलाईन अर्ज दाखल करावे–जे.डी.शाह

बीड । दिव्य न्युज

अल्पसंख्याक विकास विभाग अंतर्गत अल्पसंख्याक समुदायातील मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन पारसी, ज्यु आणि शिख या घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडून परदेशात शिक्षणासाठी सन २०२५–२६ करिता अर्ज मागविण्यात आले आहेत. परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या लाभासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी आणि अल्पसंख्याक समुदायातील घटकातील असावा. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएचडीसाठी ४० वर्षे ही कमाल वयोमर्यादा असेल. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे. परदेशी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत दोन वर्षे कालावधीत एमबीए अभ्यासक्रम अनुज्ञेय राहील.करीता बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक मुस्लिम समाजांच्या विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेऊन विदेशात शिक्षण घेण्याचे आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी तात्काळ १ ऑगस्ट २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज दाखल करावे असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.



प्रसिद्ध पत्रात म्हटले आहे की शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३० टक्के जागांवर मुलींची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. गुणवत्तेनुसार निवड करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील. एकाच कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृतीचा लाभ देता येईल. पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेत व पीएचडी साठी पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. ही पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम त्याने अर्जाच्या दिनांकाला उत्तीर्ण केलेला असावा. परदेशातील शिक्षण संस्था ही जागतीक क्रमवारीत (क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँक) २०० च्या आत असावी. सदर योजनेअंतर्गत लाभ घेवू इच्छित असलेल्या विद्यार्थ्यांस पुढील सत्राचा लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून त्यासाठी शैक्षणीक संस्था / विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे. योजनेतील लाभाचे स्वरुप –परदेशातील शैक्षणिक संस्थेने प्रवेशपत्रांमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण शुल्क, अभ्यासक्रमासाठी नजिकच्या मार्गांनी सर्वसाधारण विमान प्रवास भाडे, (परतीच्या प्रवासासह) निर्वाह भत्ता, वैयक्तीक आरोग्य विमा यावरील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष केलेला खर्च, विहित केलेल्या वित्तीय मयदित मूळ शूल्क भरणा पावती, प्रवासाचे मुळ तिकीट, मूळ बोर्डिंग पास, परतीच्या प्रयासाचे तिकीट इ. तपासून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर भारतीय रुपयामध्ये प्रतिपूर्ती केली जाईल. असेही पत्रकात नमूद केले आहे. पत्रात शेवटी म्हटले आहे की अर्जाचा नमुना व अधिक सविस्तर माहितीसाठी शासनाच्या डब्लुडब्लुडब्लु.महासाथ गोव्ह.इन या संकेतस्थळावरील ताज्या घडामोडी या लिंकवर जाऊन भेट द्यावी. संकेतस्थळावरुन अर्ज डाऊनलोड करुन तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह ऑनलाईन भरुन त्यांची प्रिंट, समक्ष किंवा पोस्टाने समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड, पुणे–४११००१ येथे सादर करावा. तसेच. महाराष्ट्र शासनाची वेबसाईट एचटीटीपीएस://एफएस महासाथ.गोईन या ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरावी, असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी केले आहे.

# दिव्य वार्ता

बुधवार ३० जुलै २०२५ | ४


## मा.आ.बाळासाहेब आजबे यांची पाटोदा येथे कार्यकर्ता संवाद बैठक

पाटोदा / दिव्य न्युज

पाटोदा येथे माजी आमदार बाळासाहेब आजबे काका यांची कार्यकर्त्या समवेत संवाद बैठक आज संपन्न झाली या प्रसंगी कार्यकर्त्यांच्या समस्या जाणून घेतल्या अनेक प्रश्न तात्काळ मार्गी लावले या प्रसंगी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले प्रसंगी पक्षात नव्याने प्रवेश केलेले माजी आमदार लक्षण जाधव यांचे चिरंजीव नगरसेवक संतोष जाधव , बालासाहेब पवार ,इम्रान नूर भाई , मस्के फौजी यांचे पक्षात प्रवेश केल्या बद्धल तालुक्याच्या वतीने तालुका अध्यक्ष दिपक



घुमरे यांनी अभिनंदन केले . या प्रसंगी ता अध्यक्ष दिपक घुमरे, बाळासाहेब पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले , प्रसंगी संवाद बैठकीस जेष्ठ नेते अण्णासाहेब लवांडे पाटील , श्याम भाऊ हुले , बप्पासाहेब जाधव , नगरसेवक बाबुराव जाधव , अंगद सेठ भोंडवे , सरपंच बाबुराव सोंडगे , सरपंच कवठेकर , भगवंन शिंदे , दादा पवार , राजेंद्र सकुंडे , खाडे फौजी , अशोक बांगर , अनिल दगडखेर , सेवासोसायटी संचालक सुभाष घुमरे , किरण पवार , मंगेश पवार , नागरजोगे नारायण , शरद गवळी , सुभाष पोकळे , मुरली तांबे ,अण्णा शिंदे , भगवान शिंदे , रामचंद्र मकाळ ,अभिजित मुंडे , आदी सह पदाधिकारी उपस्थित होते

# शहरातील रस्त्यांची दूरावस्था ;प्रशासनाचे दुर्लक्ष

### पक्ष,संघटनांनी आवाज उठवूनही यंत्रणा गप्प, काही रस्त्यांना मंजूरी पण निधी नसल्याने नागरिकांत नाराजी



#### बीडमधील या रस्त्यांची दयनीय अवस्था

छत्रपत्री शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज
बशीरगंज ते कारंजा मार्गे बलभीम चौक
कारंजा टॉवर ते जुनी भाजी मंडई
राजुरीवेस ते कबाड गल्ली मार्ग माळीवेस
माळीवेस ते बलभीम चौक
सांगली बँक कॉर्नर ते जालना रोड
बीन्डसी ते धानोरा रोड

#### शिवसेनेने केले लक्ष्यवेधी आंदोलन

शहरातील रस्त्याची झालेली बकाल अवस्था पाहून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख उल्हास गिराम यांनी नुकतेस खड्वांचे नामकरण करत निदर्शने करत ढोलताशा वाजवून निशेध आंदोलन केले होते. नगर पालिकेसमोरील चाळण झालेल्या रस्त्याची मालकी कोणाकडे हे प्रशासनाने जाहीर करावी अशी मागणीही उल्हास गिराम यांनी केलेली आहे.

बीड । दिव्य न्युज

शहरातील प्रमुख रस्त्यांची गेल्या काही वर्षात प्रचंड दूरवस्था झाली आहे. शहरांतर्गतच्या काही रस्त्यांना नव्याने मंजूरी मिळाली असली तरीही निधीअभावी ही कामे पूर्ण होत नसल्याने नागरिकांत नाराजी व्यक्त केली जात आहे. पक्ष, संघटनांनी आवाज उठवूनही यंत्रणा पाऊले उचलत नसल्याने ऐन पावसाळ्यात शहरातील नागरिकांना हाल अपेष्ठा सहन कराव्या लागत आहेत. आता निधी मंजूरी होवून रस्ता कामांना तातडीने गती द्यावी इतकी सहज साधी मागणी बीड शहरवासियांतून होत आहे.

मागील काही दिवसांपासून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून बशीरगंजमार्गे पुढे कारंजा भागाकडे जाणाऱ्या रस्त्याची प्रचंड दूरवस्था झाली आहे. ठिकठिकाणी पडलेले खडे अपघाताला निमंत्रण देत आहेत. छोटे-मोठे अपघात वाढत आहेत. अशीच अवस्था शहरातील सांगली बँक कॉर्नर ते जिल्हा क्रीडा संकुल मार्गे जालना रोडकडे जाणाऱ्या रस्त्यासह धानोरा रस्त्याची झाली आहे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसामुळे या तीनही ठिकाणच्या रस्त्यावरील खड्चात पाणी साचल्याने येथून जाणाऱ्या वाहनचालकांसह नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. बीड शहरात नगरपालिका हद्दीतील डीपी रोडला मंजूरी मिळाल्यानंतर मागील दोन वषांत अनेक भागात सिंमेट रस्ते व नालीकाम करण्यात आले. यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. शहरातील अण्णाभाऊ साठे चौक ते सुभाष रोड, सहयोगनर डी पी रोड, आदर्श नगर डीपी रोड, मोंढा नाका ते नवा पुल सिंमेट रोडसह राजीव गांधी चौक ते भक्ती कन्स्ट्रक्शन रोड, अंबिका चौक ते पिंपरगव्हाण रोड, अंबिका चौक ते पांगरी रोड, नगर नाका ते रिलायंन्स पेट्रोल पंपापर्यंतचा सिंमेट रोड, नाट्यगृह ते माने कॉम्पलेक्स आदी सिंमेट रस्ता कामे वेगाने पूर्ण झाली आहेत. त्यामुळे उर्वरित भागातील रस्तेही अशाच पध्दतीने पूर्णत्वास जावेत अशी मागणी नागरिकांतून जोर धरु लागली आहे. परंतु ही कामे होत नसल्याने आंदोलने करण्याची वेळ सामाजिक संघटना, व पक्षांवर येत आहे. तीन दिवसांपूर्वी धानोरा रोडवर पडलेल्या खड्ड्यात कागदी होडी सोडून वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलन करत रस्ता प्रश्न मागी लावण्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधले होते तर शहरात रस्त्यांची झालेली अत्यंत दयनीय अवस्था आणि नगरपरिषद मुख्याधिकारी व बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचा ढिसाळ कारभार आदी मुद्यांवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी नगरपरिषदेला वारंवार निवेदने देवून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत. मात्र अद्यापही रस्त्यांच्या कामांना प्रत्यक्ष सुरुवात कधी होणार याचे उत्तर मिळालेले नाही.

## साहित्यरत्न आण्णाभाऊं साठेंच्या लेखणीने समाजाला जागृत केले-सौ.जयश्री विधाते





बीड । दिव्य न्युज

साहित्यरत्न डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड ने आयोजीत केलेल्या गौरव महोत्सवात दि. २८-७-०२५ रोजी सायंकाळी आण्णाभाऊ साठे सभागृह मैदान चांदणेवाडा पेठ बीड येथे श्रीमती प्रेमलताताई चांदणे ज्येष्ठ मा. सभापती तथा नगरसेविका, नगर परिषद बीड. यांच्या माध्यमातून परिसरातील महीलांना कल्पतरूच्या सचिव डॉ. सारीकाताई क्षीरसागर यांच्या शुभहस्ते तर मा. सभापती तथा नगरसेविका सौ. जयश्रीताई विलास विधाते यांच्य प्रमुख उपस्थितीत साडी वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यारत्न आण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त मा. आशोक बप्पा सोनवणे, जयंती उत्सव समिती सचिव पोपटजी मिसाळ, सचिव सुनिलजी पाटोळे, सुधाकरजी धुरंधरे, केशवजी लोंढे, प्रविण थोरात यांची उपस्थिती लाभली होती कार्यक्रमाच्या

►► पान २ वर

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाच्या बैठकीत बीए, बीएससी, बीकॉमच्या अंतिम वर्षाच्या अभ्यासक्रमाची तयारी

### अध्ययन मंडळाच्या शैक्षणिक उपक्रम सुरू,अभ्यासक्रम तयारीत महत्त्वाची प्रगती प्राध्यापक फरीद अहमद नेहरी यांच्या अध्यक्षतेखाली



औरंगाबाद । दिव्य न्युज

उर्दू विभागाच्या अभ्यास मंडळाची एक महत्त्वाची बैठक आज, सोमवार, २९ जुलै रोजी सकाळी ११:३० वाजता औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आयक्यूएसी हॉलमध्ये आयोजित करण्यात आली. या बैठकीचे अध्यक्षपद प्राध्यापक डॉ. फरीद अहमद नेहरी यांनी भूषवले, ज्यांची नुकतीच बीओएसचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली आहे. यावेळी, प्रसिद्ध साहित्यिक आणि सामाजिक व्यक्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उर्दू आणि फारसी विभागाचे सदस्य हसीन अख्तर (अध्यक्ष, उर्दू तारकी तंजीम बीड) यांनी डॉ. फरीद नेहरी यांचे हार्दिक स्वागत केले आणि त्यांचे अभिनंदन केले. या बैठकीत पुढील शैक्षणिक वर्षापासून लागू होणाऱ्या बीए, बीएससी आणि बीकॉमच्या अंतिम वर्षाच्या नवीन अभ्यासक्रमाची तयारी आणि मंजुरी देण्यात आली. या

►► पान २ वर

## माजीमंत्री सुरेश वरपूडकर यांचा समर्थकांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश

परभणी । दिव्य न्युज :

सालेह चाऊस

माजीमंत्री सुरेश वरपुडकर यांच्यासह त्यांचे चिरंजीव समशेर वरपुडकर, स्नुषा प्रेरणा वरपुडकर यांच्यासह त्यांच्या समर्थक व कार्यकर्त्यांनी आज मंगळवारी (दि.२९ जुलै ) भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयात पक्षप्रवेश केला. यावेळी राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री अतुल सावे, जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आदी उपस्थित होते.



कोणताही विचार न करता आपण भारतीय जनता पक्षात प्रवेश करत असून कार्यकर्त्यांना बळ मिळावे या दृष्टिकोनातून हा प्रवेश असल्याचे यावेळी वरपूडकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले. आपण काँग्रेस पक्षाचे आमदार असताना रवींद्र चव्हाण हे सार्वजनिक बांधकाम मंत्री होते, त्यावेळी त्यांनी विकासकामासाठी सहकार्य केले याचा यावेळी वरपूडकर यांनी उल्लेख केला. पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी भारतीय जनता पक्षाचे राजकारण हे सकारात्मक असून शेवटच्या माणसाला केंद्रबिंदू मानून राजकारण करण्याची या पक्षाची पद्धत आहे. वरपूडकर यांच्या प्रवेशानंतर जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकत राहील. नेते ज्या पद्धतीने निर्णय घेतील त्यानुसार त्याची अंमलबजावणी जिल्ह्यात केली जाईल असे सांगितले.

यावेळी बोलताना बावनकुळे म्हणाले, वरपूडकरांच्या नेतृत्वात परभणी जिल्ह्यातून अनेक कार्यकर्ते प्रवेश करत असल्याने जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचा जनाधार नक्कीच वाढेल व वरपूडकरांच्या अनुभवाचा भाजपला फायदा होईल. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी राजकारणात काम करताना विकासाच्या प्रक्रियेत शेवटच्या माणसाला कसे आणता येईल याचा विचार सर्वांनी मिळून

►► पान २ वर

## शिक्षण हक्काचं-आधार भविष्यासाठी...

धारूर । दिव्य न्युज :

अखिल सय्यद

जयसिंग भैया सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक २८ जुलै २०२५ रोजी कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेमार्फत ऊसतोड कामगार व ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या उपक्रमाचा उद्देश म्हणजे सामाजिक दुर्लक्षित घटकांपर्यंत शिक्षणाची साधने पोहोचवून त्यांना शिक्षणात टिकवणे आणि आत्मभान जागवणे.

या कार्यक्रमाला जैतापूर गावाचे आदरणीय सरपंच मा. छाया भागवत दराडे यांची प्रमुख




उपस्थिती लाभली. त्यांच्यासोबत संस्थेचे सहकारी कार्यकर्ते, गावातील नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पुस्तकं, वह्या, शालेय साहित्य विद्यार्थ्यांच्या हाती पडताच त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद हेच या उपक्रमाचं खरं यश होतं. समाजाच्या शेवटच्या टोकाला हात द्यावा, शिक्षणाची मशाल पेटवावी - हेच ध्येय आमच्या संस्थेचं! कानिफनाथ संस्थेच्या वतीने अशाच उपक्रमांची सतत पुनरावृत्ती होणार आहे. कानिफनाथसंस्था शिक्षणसर्वांसाठी सेवाभावीकार्य शालेयसाहित्यवाटप ग्रामीणविद्यार्थी समाजकार्य

# सगळं होतंय,महिलांसाठी स्वच्छतागृह कधी ?

### शहरात नाही एकही सार्वजनिक स्वच्छतागृह; तीन लाख लोकसंख्येच्या बीड शहरातील समस्या

बीड । दिव्य न्युज

मराठवाड्यातील सर्वाधिक वेगाने विस्तार होणाऱ्या बीड शहरात महिलांच्या स्वच्छतागृहांची वानवा आहे. पालकमंत्र्यांपासून माजी नगरसेवकांपर्यंत सर्वजण वीज, रस्ते, पाणी अशा विकासाच्या गप्पा मारत असताना महिला स्वच्छतागृहांबाबत सर्वांनीच मिठाची गुळणी धरलेली आहे.

शहरात महिलांसाठी एकही स्वच्छतागृह नसल्याने महिलांची कुचंबना आणि त्यांच्या आरोग्याचे गंभीर प्रश्नही उद्धवत आहेत. शहरात सुभाष रोड, माळीवेस, धोंडीपुरा, बशीरगंज, भाजी मंडई, हिरालाल चौक, मोंढा, जालना रोड, नगर रोड, बार्शी रोड, बार्शी नाका, बालेपीर, तेलगाव नाका, इदगाह नाका अशी २० मोठ्या बाजारपेठांची ठिकाणे आहेत. सर्व ठिकाणे कायम गजबजलेली व वर्दळीची आहेत. शहरात एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमाला, बाजारात खरेदीला किंवा शासकीय कामांसाठी घराबाहेर पडल्यानंतर महिलांना नैसर्गिक विधीसाठी पुन्हा घरीच यावे लागते, अशी परिस्थिती सध्या दिसून येत आहे.

अन्य गोष्टीत अग्रेसर असणाऱ्या शहरात आजही महिलांचे प्रश्न सोडवण्यास सक्षमपणे पुढाकार घेताना दिसत नाही. महिलांसाठी शासन, प्रशासनाकडे थोडीही संवेदनशीलता नाही, ही लाजिरवाणी बाब आहे.

शहरातील मुख्य चौकांत सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारावीत. स्वच्छतागृह नसल्याने महिलांनी नैसर्गिक विधीसाठी जायचे कुठे, असा मोठा प्रश्न आहे.

शहातील व बाहेरून आलेल्या महिलांना शहरात नैसर्गिक विधीसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह नाही. पालिकेने महिलांसाठी स्वच्छतागृहे उभारावीत. महिलांची परवड आणि कुचंबना होते.

महिलांसाठी एकही स्वच्छतागृह नसावे ही शहराची शोकांतिका आहे. त्यामुळे महिलांची मोठी कुचंबना होते. महिलांबाबत हा दृष्टिकोन चुकीचा आहे. बाजारपेठांत सार्वजनिक स्वच्छतागृह

#### महिलांचीही परवड

शहरात १५ बालगृहे, तर २० हून अधिक निवासी गुरुकुल आहेत. या शिकणाऱ्या लहान मुलांना भेटण्यासाठी माता शहरात कायम येतात. तसेच शासकीय कामे, दवाखान्यांत आलेल्या महिलांनी नैसर्गिक विधीसाठी जायचे कुठे, असा प्रश्न आहे.

#### एकमेव बरे; मात्र वॉशिंग सेंटर चालकाकडून नो एंट्री

नगरपालिकेचे सुभाष रोडवर असलेले स्वच्छतागृह पूर्ण निकामी झाले आहे. दुसरे सिद्धिविनायक संकुलात नव्याने उभारलेल्या व सात वर्षांपासून वापराविना असलेल्या भाजी मंडई इमारत आवारात असलेले एकमेव स्वच्छतागृह देखील कुलूपबंद आहे. बाजूलाच असलेल्या वॉशिंग सेंटर चालकाकडून या स्वच्छतागृहासमोरच धुण्यासाठी वाहने उभा केलेली असल्याने महिलांना एंट्रीच नाही.




बीड : सुभाष रोडवरील सार्वजनिक स्वच्छतागृहाची अशी दुरवस्था झालेली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०